**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**
**जाहिरात क्रमांक - ०१/२०२४**

**- प्रसिध्दीपत्रक -**

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित), उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) (अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुषंगाने यापूर्वीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये सदरहू पदांच्या परीक्षा माहे नोव्हेंबर २०२४ मधील दि.२५/११/२०२४, दि.२६/११/२०२४ व दि.२७/११/२०२४ या दिनांकास घेण्याचे नियोजित होते. यासंदर्भात पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) **रचना सहायक पदाची परीक्षा** – सदरची परीक्षा दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर, २०२४ ऐवजी काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात येत आहे. परीक्षेचे नवीन वेळापत्रक यथावकाश नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२) **निम्नश्रेणी लघुलेखक व उच्चश्रेणी लघुलेखक** या पदांच्या परीक्षा दि.२६ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात येत आहेत. या पदांच्या परीक्षांचे प्रवेश पत्र (Hall Ticket) प्राप्त करून घेण्याबाबतची लिंक नजीकच्या कालावधीत नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
**(विजयकुमार ल. वाघमोडे)**
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

**(अविनाश भा. पाटील)**
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.